**नियमित दिवाणी दावा क्र.२७/२०१६**

**रामु पारठे व इतर वि. नथु पारठे व इतर**

**CNR NO.MHPU12-000232-2016**

**निशाणी क्र. १६ वरील आदेश.**

(दिनांक ०६/०५/२०२५ रोजी पारीत)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ७, नियम ११ (ए व डी)प्रमाणे वादीचा दावा फेटाळणे करीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादीने नि.क्र.१८ कडे अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे.

**०३.** प्रतिवादी क्र.०१ यांच्या म्हणण्यानुसार सदरकामी सदरील दावा मौजे आपटी, ता. भोर जि. पुणे येथील गट नंबर ३९५ याबाबत ठराव व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वाद मिळकत ही प्रतिवादी यांनी सदरील दावा दाखल करण्यापुर्वी म्हणजेच सन २०१३ साली तिन्हाईत इसमांस हस्तांतरित केलेली आहे. त्यामुळे वादी यांचे प्रतिवादी यांनी सदरील वाद मिळकत ही दिनांक ०४/०९/२०१५ रोजी विकण्याची वादी यांस धमकी दिली हे दाव्याचे कारण अनकलनीय व कायद्यास अनुसरून नाही. त्याचप्रमाणे, वादी हा त्यांच्या असणाऱ्या दाव्यामध्ये असणारी मिळकत ही एकत्र कुंटुंबाची अशी मिळकत आहे याबाबतचा उल्लेख करीत असुन वादी यांनी रे. दि. मु.नंबर ७२/२०१० हा वाटप ठराव व निरंतर ताकीदीसाठी प्रतिवादी नंबर १ यांचे विरूध्द दाखल केलेला होता. सदरील दाव्यात वादीची असणारी अविभक्त मिळकत ही विभक्त करून वादी यांचा वाद मिळकतीतील असणारा हिस्सा न्यायालयाने विभक्त केलेला आहे. त्यामुळे सदरील मिळकत ही सध्य स्थितीमध्ये अविभक्त राहीलेली नाही. सदरील ७/१२ च्या उताऱ्यावर वादी व प्रतिवादी यांच्या नावाच्या वेगवेगळया नोंदी झालेल्या आहेत. सबब, प्रस्तुत प्रतिवादींनी सदरचा अर्ज मंजुर करुन वादीचा दावा फेटाळण्याकरीता अर्ज केला आहे.

**०४.** सदर अर्जावरील वादीचे नि.क्र. १८ वरील म्हणण्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांनी दाखल केलेला अर्ज हा कायदेशीर दृष्टिकोनातून असंवैधानिक असून तो ग्राह्य धरता येणार नाही. प्रतिवादी हे दिनांक ०८/०९/२०१६ रोजी न्यायालयात हजर राहिले, परंतु त्यांनी अर्जाबाबत कोणतेही म्हणणे दिले नव्हते. त्यामुळे इतक्या विलंबानंतर अर्ज का दाखल करण्यात आला, याचा खुलासा न करता त्याने मुद्दाम टाळाटाळ केली आहे. गट क्र. ३९५ मधील वादग्रस्त हिस्सा प्रतिवादी यांनी कोणत्या तारखेला, कोणाला विक्री केला याची माहिती असूनही, त्याबाबत तपशील दिलेला नाही. तसेच गट क्र. ३९५ च्या ७/१२ उताऱ्यावर प्रतिवादी क्र. २ यांचे नाव व इतर हिस्सेदारांची नावे होती. वादींना २०१३ मध्ये झालेल्या वादग्रस्त खरेदीखताची माहिती नव्हती आणि त्या खरेदीदारांची नावे ७/१२ उताऱ्यावर लागलेली नव्हती. याच कारणामुळे प्रतिवादींकडून मिळालेल्या विक्रीच्या धमकीमुळे वादींना दावा दाखल करणे भाग पडले. तसेच प्रतिवादी यांनी रे.दि.मु. क्र. ७२/२०१० अंतर्गत वादीचा हिस्सा विभक्त झाल्याचे नमूद केले असले तरी त्या आदेशाची अंमलबजावणी अजून झाली नसल्याने मिळकत अद्याप विभक्त झालेली नाही. तसेच ७/१२ वर वादी व प्रतिवादी यांची नावे असूनही त्या स्वतंत्र नोंदी नाहीत. करीता प्रतिवादींनी सि.पी.सी. ऑ.७ रुल ११ चा दिलेला अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०५.** अभिलेखाची पाहणी केली. वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. तसेच लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. अभिलेखावरील दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

**०६.** वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थिती झाले असून त्याची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निषर्क** |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तुतचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ७, नियम ११ ए व डी) प्रमाणे फेटाळण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ०२. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

<u>**मुद्दा क्र.०१ व ०२ करीताः**</u>**–**

**०७.** अर्जाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ७, नियम ११(ए) अंतर्गत दावा फेटाळण्यासाठी याचिकेत दाव्याचे कारण स्पष्टपणे उघड झालेले नाही. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादीने दिनांक ०४/०९/२०१५ रोजी मौजे आपटी, तालुका भोर, जिल्हा पुणे येथील गट क्र. ३९५ ही वादग्रस्त मिळकत विकण्याची धमकी दिली, ज्यामुळे ठराव व निरंतर ताकीदीसाठी हा दावा दाखल झाला, हे दाव्याचे कारण याचिकेत सुस्पष्ट आहे. प्रतिवादीने सन २०१३ मध्ये मिळकत तृतीय इसमांना हस्तांतरित केल्याचा दावा केला, परंतु याबाबत खरेदीखताची तारीख, खरेदीदारांचे नाव यासारखे ठोस तपशील किंवा पुरावे सादर केले नाहीत. तसेच ७/१२ उताऱ्याच्या प्रतींचे अवलोकन केले असता, तृतीय इसमांची नावे नोंदविलेली नाहीत. यामुळे वादीच्या दाव्याचे कारण प्रथमदर्शनी वैध असून, ते नियम ११(ए) अंतर्गत फेटाळण्यास पात्र नाही.

**०८.** प्रतिवादीने रे. दि. मु. क्र. ७२/२०१० मध्ये वादीचा हिस्सा विभक्त झाल्याचा आणि ७/१२ उताऱ्यावर स्वतंत्र नोंदी असल्याचा दावा केला. याउलट, वादीने नमूद केले की, सदर आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही, आणि मिळकत अविभक्त आहे. ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, वादी आणि प्रतिवादी यांची नावे एकत्रितपणे नोंदविलेली असून, स्वतंत्र हिस्स्यांच्या नोंदी नाहीत. यावरून मिळकत अविभक्त असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. मिळकतीचे स्वरूप आणि हिस्सा–विभाजन हे पुराव्यांच्या आधारावर पडताळणीच्या टप्प्यावर (Trial) ठरवावे लागतील. या टप्प्यावर याचिकेतील मजकूर फेटाळण्याचा आधार निर्माण करत नाही.

**०९.** वादीने नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी दिनांक ०८/०९/२०१६ रोजी न्यायालयात हजर राहिले, परंतु त्यांनी अर्जाबाबत म्हणणे सादर केले नव्हते. इतक्या विलंबाने अर्ज दाखल करण्याचे कारण प्रतिवादीने स्पष्ट केलेले नाही. यामुळे प्रतिवादीचा अर्ज टाळाटाळीचा प्रयत्न असल्याचा वादीचा युक्तिवाद प्रथमदर्शनी ग्राह्य आहे. सन २०१३ मधील कथित हस्तांतरणाबाबत तपशील न देणे आणि विलंब यामुळे प्रतिवादीच्या अर्जाची विश्वासार्हता कमी होते.

१०. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ७, नियम ११ (डी) अंतर्गत दावा कायद्याने प्रतिबंधित असल्यास तो फेटाळला जाऊ शकतो. प्रतिवादीने दावा कायद्याने प्रतिबंधित असल्याचा दावा केला, परंतु कोणताही रे. दि. मु. क्र. ७२/२०१० मधील आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने मिळकत अविभक्त असल्याचे याचिकेतून दिसते. प्रतिवादीने कोणताही विशिष्ट कायदा किंवा प्रतिबंध दर्शविलेला नाही, त्यामुळे दावा नियम ११(डी) अंतर्गत फेटाळण्यास पात्र नाही.

११. या ठिकाणी नमुद करावेसे वाटते की, न्यायिक तत्त्वे: सर्वोच्च न्यायालयाने ***सालेम एडव्होकेट बार असोसिएशन विरुद्ध भारत सरकार (२००५)*** मध्ये स्पष्ट केले आहे की, आदेश ७, नियम ११ अंतर्गत केवळ याचिका आणि संलग्न कागदपत्रे विचारात घ्यावीत. याचिकेतील मजकूर आणि ७/१२ उताऱ्याच्या प्रतींवरून दावा प्रथमदर्शनी वैध आहे. कथित हस्तांतरण आणि हिस्सा–विभाजनाचे मुद्दे पुराव्यांद्वारे पडताळावे लागतील. प्रस्तुत प्रकरणातील दाव्याचे कारण स्पष्ट आहे, आणि दावा कायद्याने प्रतिबंधित नाही. मिळकतीचे स्वरूप व हस्तांतरणाचे मुद्दे सखोल पडताळणीस पात्र आहेत. त्यामुळे दावा आदेश ७, नियम ११ (ए व डी) अंतर्गत फेटाळण्यास पात्र नाही. सबब, प्रथमदर्शनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींच्या बाजुने शाबीत होत नाही. म्हणुन मी वाद प्रश्न क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन वाद प्रश्न क्र. २ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

:: <u>आदेश</u> ::

०१. अर्ज फेटाळण्यात येतो.

JADHAV MEENA WAMAN
Digitally signed by JADHAV MEENA WAMAN
Date: 2025.05.08 16:30:57 +0530

**भोर** **( मीना वामन जाधव)**

**दिनांकः ०६/०५/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, भोर .**

**CERTIFICATE**

I affirms that the contents of this P. D. F. file order are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | Hon'ble Smt. Meena W. Jadhav<br>C.J.J.D. & J.M.F.C., Bhor, Pune |
| Name of the Steno | :- | M. S. Kondhare L.G. |
| Date of Order | :- | 06/05/2025 |
| Signed by P.O. | :- | 06/05/2025 |
| Order uploaded on | :- | 08/05/2025 |